# नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,
त्र्यंबक नाक्याजवळ, नाशिक.
दू.०२५३-२५९६९५७, फॅक्स ०२५३-२५०८३८९ इमेल-ceozpnsk@gmail.com

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
साप्रवि/मुकाअ/वैका/ १५३ /१७
नाशिक, दिनांक, ०५/०७/२०१७

परिपत्रक

**विषय-सर्व खातेप्रमुख, गट विकास अधिकारी, सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी सोमवारी मुख्यालय न सोडणेबाबत.**

दि.०५/०७/२०१७ रोजीच्या जि.प. सर्वसाधारण सभेत झालेल्या चर्चेनुसार सन्मा.सदस्य व सन्मा. पदाधिकारी यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की, सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी दर सोमवारी मुख्यालयी रहणे बंधनकारक असतांना अनेकदा जिल्हा व तालुका पातळीवर अधिकारी/कर्मचारी हे अथवा वरिष्ठांची परवानगी न घेता परस्पर दौऱ्यावर निघून जातात व अशावेळी ग्रामस्थ किंवा मा.लोकप्रतिनिधी कार्यालयात शासकीय कामकाजासाठी आल्यास त्यांना योग्य माहिती दिली जात नाही व संबंधीत अधिकारी/कर्मचारी त्यांना उपलब्ध न झाल्याने त्यांच्या कामाची माहिती त्यांना होत नाही व पर्यायाने त्यांच्या वेळेचा खोळंबा होतो. याबाबत सन्मा.सभागृहाने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे.

तरी यापुढे दर सोमवारी सर्व खातेप्रमुख, गट विकास अधिकारी, सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी वरिष्ठांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय सोमवारी मुख्यालय सोडू नये. व वरिष्ठांच्या आदेशाशिवाय सोमवारी मुख्यालय सोडल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ अन्वये शिस्तभंगाची कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

CHIEF EXECUTIVE OFFICER * PARISHAD, NASHIK

Deepak 5/7/17
(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

प्रत माहितीस्तव सविनय सादर-

१. मा. अध्यक्षा, जिल्हा परिषद नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालय.
२. मा.उपाध्यक्षा, जिल्हा परिषद नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालय.
३. मा.सभापती, विषय समिती (सर्व), जिल्हा परिषद नाशिक यांचे वैयक्तिक कार्यालय.
४. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक, आयुक्त कार्यालय नाशिकरोड.

प्रत तात्काळ कार्यवाहीस्तव-

१. खातेप्रमुख --- (सर्व), जिल्हा परिषद नाशिक यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणणेकामी.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती --- (सर्व), जिल्हा परिषद नाशिक यांनी त्यांचे अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणणेकामी.

**विषय :** जिल्हा परिषद, नाशिक अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक आरोग्य पथके व आयुर्वेदिक दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी यांचे उपस्थिती बाबत..

## नाशिक जिल्हा परिषद, नाशिक

जावक क्रमांक : मुकाअ/वै.का/१५० /२०१७.
नाशिक, दिनांक : ०५ /०७/२०१७.

### -: परिपत्रक :-

माझे असे निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषद, नाशिकचे विहित आरोग्य संस्थांवर कार्यरत वैद्यकीय अधिकारी हे आरोग्य संस्थेच्या संबंधित तालुका आरोग्य अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची लेखी अथवा तोंडी सूचना न देता परस्पर रजेवर जातात, किंवा मुख्यालयातंर्गत अर्ज देऊन परस्पर रजेवर जातात, यामुळे संबंधित कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांचे प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य पथक, आयुर्वेदिक दवाखाने हे वैद्यकीय अधिकारी विना राहते, यामुळे आरोग्य संस्थेच्या कार्यक्षेत्रातील रुग्णांना आरोग्य सुविधेपासुन वंचित रहावे लागते. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारी येतात. यामुळे लोकप्रतिनिधी व नागरिकांचे रोषास प्रशासनास सामोरे जावे लागते.

त्याअनुषंगाने कुठलीही आरोग्य संस्था वैद्यकीय अधिकारी यांचे विना राहु नये व आरोग्य संस्थांचे प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी सर्व वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांचे आरोग्य संस्थेवर पर्यायी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असलेशिवाय किंवा पर्यायी व्यवस्था केलेशिवाय रजेवर जाऊ नये व मुख्यालय सोडू नये. कोणतीही आरोग्य संस्था वैद्यकीय अधिका-याविना राहता कामा नये. तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांनी त्यांचे तालुकातंर्गत असलेल्या सर्व आरोग्य संस्थेवर वैद्यकीय अधिकारी यांची त्यांचे स्तरावर पर्यायी व्यवस्था केलेशिवाय कोणत्याही वैद्यकीय अधिकारी यांचे रजेसाठीचे अर्जावर शिफारस करु नये.

आरोग्य सुविधा हि अत्यावश्यक सेवा असल्याने व ती नियमितपणे उपलब्ध होणेसाठी सार्वजनिक सुटीच्या दिवशी व रविवारी वैद्यकीय अधिकारी यांचेपैकी एकाने आरोग्य संस्थेत कर्तव्यांवर थांबुन आरोग्य सेवा देणे अनिवार्य असेल, याबाबतची व्यवस्था करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित तालुका वैद्यकीय अधिकारी यांची असेल, याची याव्दारे नोंद घ्यावी.

Deepak 5/7

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

प्रति,

०१. तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ......................
०२. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र (सर्व) ......................
०३. वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य पथक (सर्व) ......................
०४. वैद्यकीय अधिकारी, आयुर्वेदिक दवाखाने (सर्व) ......................

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर.**

०१. मा.अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
०२. मा.अध्यक्षा, जिल्हा परिषद, नाशिक. / मा.उपाध्यक्ष / मा.सभापती, विषय समिती [सर्व], जि.प.नाशिक
०३. मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक .
०४. मा.जिल्हाधिकारी, नाशिक.

**प्रत :** गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) ......................
**प्रत :** कार्यालयीन प्रत / ज्ञापन नस्ती.